**तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद**
**शासकीय तंत्रनिकेतन च्या बाजूला, उस्मानपुरा,**
**पत्र पेटी क्रमांक -५१६ औरंगाबाद - ४३१ ००५**
(०२४०)२३३४२१६ (P),२३३४७६९ (O),२३४०६५८(R),Fax-०२४०-२३५६८२०
**Email : roaurangabad@dtemaharashtra.gov.in Web: http://www. dteau.org**


**जा.क्र.विकाऔ/आस्था-३/२०१९/**1324
**दिनांक :-** 4 MAY 2019

प्रति,

**प्राचार्य,**

शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय,औरंगाबाद.

शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय,औरंगाबाद.

**प्राचार्य**,शासकीय तंत्रनिकेतन,

औरंगाबाद/जालना/जिंतूर/नांदेड/बीड/उस्मानाबाद/पु.ला.शा.तं.लातूर.

**विषय** - सातव्या वेतन आयोगामध्ये तीन लाभांच्या सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेच्या अनुज्ञेयतेबाबत प्रोग्रामर पदावर कार्यरत कर्मचाऱ्यांची माहिती.

**संदर्भ** १. शासन वित्त विभाग निर्णय क्र. वेतन १११९/प्र.क्र.३/२०१९/सेवा-३, दि. ०२/०३/२०१९
२. मा.संचालक, तं.शि.सं.म.रा.मुंबई यांचे पत्र क्र.१२/आस्था(२)/२०१९/सेआप्रयो/२९८, दि. २२/०४/२०१९.

उपरोक्त संदर्भीय पत्रानुसार आपणास कळविण्यात येते की, संचालनालयाच्या संदर्भीय पत्र क्र. ०२ मधील सुचनांचे काटेकोरपणे अवलोकन करुन तसेच संदर्भीय शासन निर्णय क्र.०१ मध्ये नमूद तरतूदींनुसार, आपल्या संस्थेत प्रोग्रामर पदावर पात्र कर्मचाऱ्यांची, पुर्वीच्या अनुज्ञेय योजनेनुसार १२/२४ वर्षानंतर (दि.३१/१२/२०१५ पर्यंत तसेच दि. ०१/०१/२०१६ ते ३१/१२/२०१८ पर्यंतच्या कालावधीत) ज्या कर्मचाऱ्यांनी यथास्थिती पहिला व दुसरा लाभ घेतला आहे, त्यांना १०/२०/३० वर्षानंतर अनुज्ञेय ठरणारी तीन लाभाची सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू करण्याकरीता तसेच ज्या कर्मचाऱ्यांना दि.०१/०१/२०१६ नंतर दि. ३१/१२/२०१८ पर्यंतच्या कालावधीत सेवेची १०-२० वर्षे पुर्ण होत आहेत. अशा संबंधीत कर्मचाऱ्यांची माहिती सोबत जोडलेल्या प्रपत्रामध्ये भरुन तात्काळ या कार्यालयास पाठविण्यात यावी, तसेच या कार्यालयाच्या ई-मेलवर सॉफ्ट कॉपी पाठविण्यात यावी. (पीडीएफ फाईल पाठविण्यात येवू नये.) जेणेकरुन सदरील माहिती संचालनालयास सादर करणे सुलभ होईल.

**सोबत** — वरील प्रमाणे.

प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,औरंगाबाद

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्रपेटी क्रमांक 1967, मुंबई - 400001
दूरध्वनी - 22620601, 22690602 22641150/51, फॅक्स 26292102
E-mail :- desk12@dtemaharashtra.gov.in internet :- http://www.dtemaharashtra.gov.in


क्रमांक : १२/आस्था(२)/२०१९/सेआप्रयो/ २९६
दिनांक :

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/ पुणे/ नाशिक/ औरंगाबाद/ अमरावती/ नागपूर

**विषय : सातव्या वेतन आयोगामध्ये तीन लाभांच्या सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेच्या अनुज्ञेयतेबाबत..प्रोग्रामर पदावर कार्यरत कर्मचाऱ्यांची माहिती..**

संदर्भ : शासन वित्त विभाग निर्णय क्र. वेतन १११९/प्र.क्र.३/२०१९/सेवा ३, दि.२.३.२०१९

दि. १.१.२०१६ ते सातव्या वेतन आयोगानुसार सुधारीत सेवांतर्गत प्रगती योजनेचा लाभ अनुज्ञेय करण्याबाबतचे आदेश, निर्गमित होण्याच्या तारखेपर्यत ज्यांना, शासन निर्णय वित्त विभाग दि. १.४.२०१० नुसार सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा यथास्थिती पहिला वा दुसरा लाभ मंजूर करण्यात आला आहे, अशा कर्मचारी/ अधिकारी यांचे असुधारीत लाभाचे, यापूर्वीचे आदेश रद्द करुन त्यांना तीन लाभाच्या योजनेनुसार सातव्या वेतन आयोगाच्या वेतन मॅट्रीक्सनुसार, पदोन्नतीच्या पदाच्या सातवया वेतन आयोगाच्या वेतनश्रेणी, सदर लाभ सुधारीतरित्या मंजूर करण्यात येती. त्याअनुषंगाने असुधारीत लाभाची रक्कम सुधारीत लाभाच्या रकमेशी समायोजीत करुन फरकाची रक्कम संबंधीतांना अनुज्ञेय करण्यात यावी, असे आदेश संदर्भाधीन शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आलेले आहेत. तसेच या तीन लाभाच्या योजनेच्या लाभार्थीस पदोन्नतीच्या पदाकरीता विहीत केलेली अर्हता, जेष्ठता, पात्रता, अर्हता परीक्षा, विभागीय परीक्षा उत्तीर्ण असणे, गोपनीय अहवालाची प्रतवारी, विभागीय चौकशी व न्यायिक प्रकरण प्रलंबित नसणे, जातीवैधता प्रमाणपत्र उपलब्ध असणे, अशा पदोन्नतीच्या कार्यपध्दतीची विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकीत पूर्तता करणे आवश्यक आहे, असेही नमूद करण्यात आलेले आहे.

आस्था-3 संदर्भाधीन शासन निर्णयातील उपरोक्त नमूद तरतूदींनुसार, या संचालनालयाच्या अधिपत्याखालील वर्ग ३ मधील प्रोग्रामर पदावर कार्यरत कर्मचाऱ्यांची, पूर्वीच्या अनुज्ञेय योजनेनुसार १२/२४ वर्षानंतर (दि. ३१.१२.२०१५ पर्यत तसेच दि. १.१.२०१६ ते दि. ३१.१२.२०१८ पर्यतच्या कालावधीत) ज्या कर्मचाऱ्यांनी यथास्थिती पहिला व दुसरा लाभ घेतला आहे, त्यांना १०/२०/३० वर्षानंतर अनुज्ञेय ठरणारी तीन लाभाची सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू करण्याकरीता तसेच ज्या कर्मचाऱ्यांना दि.१.१.२०१६ नंतर दि. ३१.१२.२०१८ पर्यतच्या कालावधीत सेवेची १०-२० वर्षे पूर्ण होत आहेत, अशा संबंधीत कर्मचाऱ्यांची माहिती सोबत जोडलेल्या प्रपत्रामध्ये दि. ३०.४.२०१९ पर्यत आवश्यक त्या कागदपत्रांसह सादर करावी. तसेच कार्यासन क्रमांक १२ च्या ई-मेलवर सॉफ्ट कॉपी पाठविण्यात यावी. (पीडीएफ फाईल पाठविण्यात येवू नये.)

(प्रमोद नाईक)
सहसंचालक, तंत्रशिक्षण, म.रा., मुंबई


सहसंचालक, तंत्रशिक्षण,
वि.का. औरंगाबाद
आवक क्र. 3178
दिनांक 30 APR 2019


25/4/19

पूर्वीच्या अनुज्ञेय योजनेनुसार १२/२४ वर्षानंतर (दि. ३१.१२.२०१५ पर्यत तसेच दि. १.१.२०१६ ते दि. ३१.१२.२०१८ पर्यतच्या कालावधीत) ज्या कर्मचाऱ्यांना यथास्थिती पहिला व दुसरा लाभ घेतला आहे, त्यांना १०/२०/३० वर्षानंतर अनुज्ञेय ठरणारी तीन लाभाची सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू करण्याकरीता तसेच ज्या कर्मचाऱ्यांना दि.१.१.२०१६ नंतर दि. ३१.१२.२०१८ पर्यतच्या कालावधीत सेवेची १०-२० वर्षे पूर्ण होत आहेत, अशा प्रोग्रामर पदांवर कार्यरत कर्मचाऱ्यांची माहिती

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांचे नांव, पदनाम, कार्यरत कार्यालय/ संस्थेचे नांव | प्रवर्ग (मागास वर्गीय असल्यास जात वैधता प्रमाणपत्र आहे किंवा कसे प्रत जोडण्यात यावी) | प्रथम नियुक्तीचा दि./ पदनाम (नियुक्ती आदेश जोडण्यात यावेत) | प्रथम लाभाचा दि. पदनाम वेतनसंरचना | प्रथम नियुक्ती/ लाभ मिळाल्यापासून १२ वर्षे पूर्ण केल्याचा दि. पदनाम वेतनसंरचना | दि.१.१.२०१६ नंतर दि. ३१.१२.२०१८ पर्यतच्या कालावधीत सेवेची १० -२० वर्षे पूर्ण केल्याचा दि. पदनाम, वेतनसंरचना | प्रथम नियुक्तीदि./ योजनेचा प्रथम लाभ लागू झाल्याचा दि. पदनाम वेतनसंरचना | योजनेचा द्वितीय लाभ लागू झाल्याचा दि., पदनाम, वेतनसंरचना | दि.१.१.२०१६ ते ३१.१२.२०१८ या कालावधीत १०-२० वर्षे सेवा पूर्ण केल्याचा दि., पदनाम, वेतनसंरचना | दि.१.१.२०१६ नंतर दि. ३१.१२.२०१८ पर्यतच्या कालावधीत सेवेची १० -२० -३० वर्षे पूर्ण केल्याचा दि. पदनाम, वेतनसंरचना | दि. ३१.३.२०१९ पर्यतचे मत्ता दायित्व | विभागीय चौकशी/ न्यायिक प्रकरणे प्रलंबित आहेत किंवा कसे | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ |
| | | | | | | | | | | | | | |

कार्यालय/ संस्था प्रमुखांची स्वाक्षरी